दि. २४ मार्च २०१९ रोजी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीला पक्की शाई न लावता उजव्या हाताच्या तर्जनीला शाई लावण्या बाबत...

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१९/प्र.क्र.०४/का-८
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २० मार्च २०१९

**प्रस्तावना:**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या वेळी मतदारांची ओळख पटल्यानंतर त्या मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीला (Left Forefinger) न मिटणारी पक्की शाई वापरून निशाणी करण्याबाबत तसेच पुर्नमतदानाच्यावेळी मधल्या बोटाला शाई लावण्याबाबत राज्य निवडणूक अयोगाच्या स्थायी सूचना आहेत.

२. राज्य निवडणूक आयोगाने फेब्रुवारी २०१९ मध्ये घोषित केलेल्या कार्यक्रमाप्रमाणे खाली नमूद केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता दि.२४ मार्च २०१९ रोजी मतदान घेण्यात येणार आहेत:

| | | |
|---|---|---|
| i. | ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीची संख्या- | : ५५७ |
| ii. | ग्रामपंचायत सरपंच पदाच्या रिक्त पदांची संख्या- | : ८२ |
| iii. | नगरपरिषद ~~प्रोट~~ निवडणूक ~~सार्वत्रिक-~~ | : ३ |
| iv. | जिल्हा परिषद/पंचायत समिती पोट निवडणूक | : ४ |

३. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ करिता भारत निवडणूक आयोगाने दि.१० मार्च २०१९ अन्वये घोषित केलेल्या कार्यक्रमाप्रमाणे महाराष्ट्र राज्यात दि.११ एप्रिल ते दि.२९ एप्रिल २०१९ या कालावधीत चार टप्प्यांत मतदान घेण्यात येणार आहे.

४. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकरिता दि.२४ मार्च २०१९ रोजी लावण्यात येणाऱ्या शाईमुळे दि.११ एप्रिल ते दि.२९ एप्रिल २०१९ या कालावधीत होणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकांमध्ये लोकांच्या मनामध्ये संभ्रम होऊ नये याकरिता मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांनी त्यांचे प्रत्र क्रमांक.जीईएल २०१९/प्र.क्र.३१२/२०१९/३३, दि.१९ मार्च २०१९ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या २४ मार्च २०१९ रोजी होणाऱ्या निवडणुकांकरिता डाव्या हाताच्या तर्जनीला (Left Forefinger) न

मिटणारी पक्की शाई न लावता इतर बोटांपैकी एका बोटावर शाई लावण्याचे निर्देश देण्याची विनंती केली आहे.

५. मुख्य निवडणूक अधिकारी यांनी केलेल्या विनंतीचा राज्य निवडणूक आयोगाकडून सांगोपांग विचार करण्यात आला आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून दि.२४ मार्च २०१९ रोजी घेण्यात येणाऱ्या निवडणुकीमधील एकूण जागा व मतदारांची संख्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीपेक्षा अत्यंत कमी असल्याने राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहेत:

**आदेश**

*महाराष्ट्र राज्यामध्ये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ करिता दि. ११ एप्रिल ते दि.२९ एप्रिल २०१९ या कालावधीत होणारे मतदान लक्षात घेता,* ***राज्य निवडणूक आयोगाच्या दि.२४ मार्च २०१९ रोजी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीला शाई न लावता उजव्या हाताच्या तर्जनीला शाई लावण्यात यावी.***

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:

१) मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य
२) सर्व महानगरपालिका आयुक्त
३) सर्व जिल्हाधिकारी